# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०४/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २५,४२,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०३/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, तुमसर कडुन रामटेक कडे जाणाऱ्या रोडने अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) ट्रक मध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून तुमसर कडुन रामटेक कडे जाण्या—या रोडने १४ चक्का ट्रक क्र.एम.एच—४०/सी.डी ९९७५ समोरून येतांनी दिसला. ट्रकला थांबवुन ट्रक चालकास ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने ट्रकमध्ये रेती असल्याचे सांगितले. चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितले. ट्रक चा चालकाने विनापरवाना अवैदयरित्या रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने ट्रक मधील १४ ब्रास रेती प्रत्येकी ब्रास ३०००/—रू प्रमाणे ४२०००/—रू, १४ चक्का ट्रक क्र. एम.एच.—४० सी.डी ९९७५ किंमती २५,००,०००/— रू असा एकुण २५,४२,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे— अमोल रमेशराव देशमुख, रा. वार्ड क्र. ०६, हिंगणघाट पुलगाव वर्धा यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे अप क्र. २६५/२०२४ कलम ३७९ भा.द.वी. सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगाले, गजानन माहुरे, पोना प्रफुल रंधई, पोशि मंगेश सोनटक्के, धिरज खंते, शिवशंकर भोयर यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर